- मोरारजी देसाई यांनी जनता पार्टी सरकारने 43 व्या 44 व्या घटनादुरुस्ती अन्वये (1977 व 1978) 42 व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट तरतुदी काढण्याचा प्रयत्न केला पण मूलभूत कर्तव्याला स्पर्श केला नाही.
- नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांवरील वर्मा समितीने (1999) मु. क. अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या कायदयाच्या तरतुदींची ओळख केली होती.

**मुलभूत कर्तव्याची वैशिष्ट्ये :-**

- मूलभूत हक्क नागरिकांना व परकियांना उपलब्ध होतात मात्र मूलभूत कर्तव्य केवळ भारतीय नागरिकांना लागू होतात.
- मुलभूत कर्तव्य न्यायप्रविष्ठ नसतात.
- सकारात्मक व नकारात्मक असतात.
- नागरी आणि नैतिक असे दोन स्वरुपाचे असतात.
- मुलभूत कर्तव्य जनतेकडून केलेल्या अपेक्षा असतात.

**मुलभूत कर्तव्यांची यादी - (कलम 51A)**

1) घटनेचे पालन, तिचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2) राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा या आदर्शांची जोपासना व अनुकरण करणे.
3) भारताचे, एकता, एकात्मता उन्नत ठेवणे व रक्षण करणे.
4) देशाचे संरक्षण व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.
5) धार्मिक, भाषिक वादाच्या पलीकडे जाऊन जनतेमध्ये सामंजस्य, बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.
6) संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारशांचे मोल जाणणे व जतन करणे.
7) नैसर्गिक पर्यावरणांचे रक्षण व सुधारणा, प्राण्यांविषयी दया बाळगणे.
8) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद व शोधकबुध्दी, सुधारणावाद यांचा विकास करणे.
9) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण व हिंसांचाराचा त्याग करणे.
10) राष्ट्र उपक्रम व श्रेणी यांत चढता क्रम गाठला जाईल अशा प्रकारे उत्तमता संपादनासाठी सतत झटणे.
11) 86 व्या घटनादुरुस्तीने 2002 ने जो जन्मदाता / पालक असेल त्याने पाल्यास वयाच्या 6 ते 14 वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.

**मूलभूत कर्तव्याचे महत्त्व :-**

- देश, समाज व इतराप्रती कर्तव्याची आठवण.
- राष्ट्रविरोधी व समाजविरोधी कृत्यांना पायबंद.
- शिस्त आणि जबाबदारीची जाणीव.

**मूलभूत कर्तव्यावरील सर्वोच्च न्यायालयातील खटले :-**

- **1970 - चंद्रभवन बोर्डींग विरुद्ध म्हैसूर सरकार.**
  राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्क असणे आणि मुलभूत कर्तव्य नसणे हा एक विरोधाभास आहे. त्यामूळे घटनेत मुलभूत कर्तव्याचा समावेश करावा
- **1988 - एम.सी. मेहता विरुद्ध भारतीय संघराज्य.**
  देशातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये नैसर्गिक पर्यावरणाच्या [illegible] सुधारणे करिता आठवड्यातील किमान एक तास पर्यावरणाबाबत शिकविणे अत्यावश्यक आहे.
- **1992 - मोहन सिंघानिया विरुद्ध भारतीय संघराज्य.**
  UPSC व MPSC द्वारे निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते ते कलम 51-अ नुसार .

**मूलभूत कर्तव्यावरील टीका :-**

- राजकर्त्यावरील जबाबदारीचा अनुल्लेख.
- मूलभूत कर्तव्याची यादी अपुरी.
- नागरिकांच्या गुलाबाची सनद.
- न्यायाप्रविष्ठ नसतात.
- भाग 3 ला जोडावयास हवी होती.

## 11. राष्ट्रपती
## भाग V कलम 52 ते 62

- **स्वीकार** - इंग्लंड व फ्रान्स.
- देशाचे प्रथम नागरिक असुन घटनात्मक कार्यकारी आणि नाममात्र प्रमुख म्हणुन ओळखले जातात. तिन्ही सेनेचा सरसेनापती असतो.
- देशाचा उत्सवमूर्ती असतात.
- **कलम 52** - मध्ये भारताचा एक राष्ट्रपती असेल हि तरतूद.
- **कलम 53 (1)** - नुसार, भारताच्या संघराज्याचा कार्यकारी अधिकार राष्ट्रपतीकडे असेल हि तरतूद.
- **कलम 53 (2)** - नुसार, राष्ट्रपती संघराज्याच्या संरक्षक दलांचे सरसेनापती असतील.
- **कलम 54** - नुसार, राष्ट्रपतीची निवडणूक एका निर्वाचक गणाकडून होते. त्यात सदस्य
  1) संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निर्वाचित सदस्य
  2) राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य
  3) दिल्ली व पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य [ही तरतूद घटनेच्या 70 व्या दुरुस्तीने (1992) समाविष्ट करण्यात आली.
- **कलम 55 - नुसार राष्ट्रपतीच्या निवडणुकीची पद्धत -**
- अप्रत्यक्ष निवडणुक.
- राष्ट्रपतीची निवडणूक 'एकल संक्रमणीत मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दती' या पध्दतीद्वारे गुप्त मतदान घेतले जाते.
- **कलम 56 (1)** - नुसार राष्ट्रपतीचा पदावधी पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पुढे पाच वर्षे इतका असतो.
- राष्ट्रपती लेखी राजीनामा उप-राष्ट्रपतीस संबोधून देऊ शकतात.
- राष्ट्रपतीला घटनाभंग केल्याबद्दल कलम 61 मध्ये सांगितल्याप्रमाणे महाभियोगाद्वारे पदावरुन दूर करता येते.
- पद संपल्यानंतरही त्याचा उत्तरअधिकारी पद ग्रहण करेपर्यंत पद धारण चालू ठेवू शकतो.
- **कलम 57** - राष्ट्रपती पूर्ननेमणुकीसाठी पात्र असतात. (कितीवेळा)
- आतापर्यंत राजेंद्र प्रसाद यांनीच 2 दा राष्ट्रपतीपद भूषविले आहे.
- USA चे राष्ट्रपती केवळ 2 वेळेस पद धारण करु शकतात.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **कलम 58 - राष्ट्रपतीची पात्रता :-**
- तो व्यक्ती भारतीय नागरिक असावा.
- वय 35 वर्षे पूर्ण झाली पाहिजे.
- तो लोकसभा सदस्य म्हणून निवडूण येण्यास पात्र असावा.
- तो कोणताही सार्वजनिक प्राधिकारी यांच्या नियंत्रणाखालील पद धारण करणारा नसावा.
- मात्र कार्यरत राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, मंत्री हे पात्रता प्राप्त असतात.
- राष्ट्रपती पदासाठी Nomination (आवेदनपत्र) भरतांना उमेदवारास किमान 50 मतदान पाठिंबा व 50 मतदात्यांनी अनुमोदन देणे गरजेचे आहे.
- प्रत्येक उमेदवाराने भारतीय रिझर्व्ह बँकेत रु. 15000 अनामत रक्कम (Security deoposit) भरणे गरजेचे आहे.
- प्रत्येक एकुण मतांच्या $\frac{1}{6}$ मते न मिळाल्यास ती रक्कम जप्त होते. (हे बदल 1997 मध्ये करण्यात आले)
- राष्ट्रपती पदासाठी व्यक्ती खासदार / आमदार नसावा.
- राष्ट्रपतीचे पगार व भत्ते त्याच्या पदावधी दरम्यान कमी केले जाणार नाहीत.
- **कलम 59 - राष्ट्रपती पदाच्या सेवाशर्ती :-**
- राष्ट्रपती हा संसद किंवा राज्य विधीमंडळाचा सदस्य नसावा.
- कोणतेही लाभाचे पद धारण करणारा नसावा.
- मनोरुग्ण व दिवाळखोर नसावा.
- **कलम 60** - नुसार राष्ट्रपतीला सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश समक्ष शपथ घ्यावी लागते.
- **कलम 61** - मध्ये राष्ट्रपतींवर महाभियोग लावून पदावरुन दूर करु शकतात.
- एकुण सभासदांच्या 2/3 बहुमताने पारित होणे गरजेचे.
- राष्ट्रपती गैरहजर असेल तर उपराष्ट्रपती काम करतात.
- उपराष्ट्रपती व राष्ट्रपती पद रिक्त असेल तर भारताचे सरन्यायाधीश काम करतात व यांचेही पद रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयाचे उपलब्ध ज्येष्ठतम न्यायाधीश हंगामी राष्ट्रपती म्हणून कार्य करतील.
- **कलम 62** - राष्ट्रपतीचे पद, राजीनामा, मृत्यू, महाभियोग यामुळे त्यांच्या अनुपस्थित हंगामी राष्ट्रपती म्हणुन काम करण्याचे उपराष्ट्रपतीचे अधिकार.

**❍ राष्ट्रपतीचे अधिकार**

**1) कार्यकारी अधिकार**

- **कलम 75 (1)** - राष्ट्रपती पंतप्रधानांची नेमणूक करतात व त्याच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नेमणुक करतात.
- महान्यायवादवाची नेमणूक व पगार व भत्ते ठरवितात.
- भारताचे महालेखापाल, मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त, संघ लोक सेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्यांचे राज्यपाल, वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्य इ. नेमणूक करतात.
- राष्ट्रपती कोणतेही क्षेत्र अनुसुचित म्हणून जाहीर करु शकतात, आंतर-राज्यीय परिषदेची स्थापना करु शकतात.

**2) कायदेविषयक अधिकार**

- **कलम 85** - संसदेचे स्वतंत्र अधिवेशन बोलविणे, सत्रसमाप्ती करणे
- **कलम 85(2)** - राष्ट्रपती राज्यसभेवर साहित्य, विज्ञान, कला व सामाजिक सेवा या क्षेत्रातील विशेष ज्ञान/अनुभव असणाऱ्या 12 सदस्यांना नामनिर्देशित करतात.
- **कलम 85 (3)** - पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार लोकसभा विसर्जित करणे.
- **कलम 87** - पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला राष्ट्रपती सार्वत्रिक निवडणुकीनंतर अभिभाषण करतात. (दरवर्षी पहिल्या अधिवेशनासमोर)
- **कलम 108** - संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक घेण्याचा इ. अधिकार. (बैठकीचे अध्यक्षस्थान हे लोकसभेचे अध्यक्ष भुषवितात)
- **कलम 240** - नुसार कांही केंद्रशासित प्रदेशांमध्ये शांतता, विकास व सुशासन यांसाठी नियम तयार करण्याचा अधिकार आहे. अंदमान व निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा व नगर हवेली, दमण व दीव व, पुद्दुचेरी मात्र राष्ट्रपतींना असे नियम केवळ पुद्दुचेरी विधिमंडळ स्थगित/विसर्जीत करण्यात आले असेल तरच करतात.

**3) वित्तीय अधिकार**

- **कलम 109** - अर्थविधेयक केवळ राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने लोकसभेत सादर केले जाते.
- **कलम 112** - राष्ट्रपती संसदेत वार्षिक वित्तीय वितरणपत्रक (केंद्र शासनाचा अर्थ संकल्प) मांडण्याचे घडवून आणतात.
- **कलम 116** - अनुदानाची मागणी राष्ट्रपतीच्या संमतीनेच करता येते.
- **कलम 267** - अचानकपणे उदभवलेला खर्च करण्यासाठी राष्ट्रपती आकस्मिक खर्च निधीमधून अग्रिम राशीची तरतुद करु शकतात.
- **कलम 280** - केंद्र व राज्यामध्ये कर उत्पन्नाची वाटणी करण्यासाठी राष्ट्रपतींना दर 5 वर्षांनी राष्ट्रीय वित्त आयोग नेमण्याचा अधिकार आहे.

**4) न्यायविषयक अधिकार**

- **कलम 124 (2)** - राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश व अन्य न्यायाधीशांची नेमणुक करतात.
- **कलम 72** - व्यक्तीला शिक्षेबद्दल क्षमादान करण्याचा, शिक्षा तहकुबी देण्याचा, तीत विश्राम किंवा सूट देण्याचा अथवा शिक्षादेश निलंबित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.
- **कलम 143** - राष्ट्रपती वेळोवेळी कायदेविषयक सल्ला सर्वोच्च न्यायालयाकडे मागवतात मागू शकतात.
- **कलम 216** - उच्च न्यायालयातील न्यायाधिशांची सदस्य संख्या ठरविणे.



27/71

**5) परराष्ट्रविषयक अधिकार**

- भारताचे राजदुत व राजनैतिक अधिकारी यांचा नेमणुका राष्ट्रपती करतात.
- राष्ट्रपती आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधीत्व करतात.

**6) लष्करी अधिकार**

- **कलम 53(2)** - राष्ट्रपती तिन्ही संरक्षक दलांचे सरसेनापती म्हणून कार्य करतात.
- राष्ट्रपती - थलसेना, हवाईसेवा व नौसेनेच्या प्रमुखांची नेमणुक करतात.
- युध्द व शांतता यांविषयीचे सर्व निर्णय राष्ट्रपतीच्या आदेशानुसार व संसदेच्या मान्यतेने ठरतात.

**7) आणीबाणी विषयक अधिकार**

- आणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठी राष्ट्रपतींना 3 प्रकारची आणीबाणी घोषित करता येते.
  1) राष्ट्रीय आणीबाणी (कलम 352)
  2) घटकराज्य आणीबाणी/राष्ट्रपती राजवट (356 व 365)
  3) आर्थिक आणीबाणी (360)

**❍ राष्ट्रपतींना प्राप्त नकाराधिकार (कलम 111)**

- संसदेने पारित केलेल्या विधेयकाला संमती रोखून ठेवून राष्ट्रपती आपला नकाराधिकाराचा वापर करु शकतात.
  राष्ट्रपतींना नकाराधिकार देण्यामागे 2 उद्दिष्टे
  1) संसदेने घाईघाईने व पुरेसा विचार न करता संमत केलेली विधेयक रोखण्यासाठी.
  2) घटनाविरोधी असणारी विधेयक रोखण्यासाठी.

**❍ नकाराधिकाराचे प्रकार**

**पूर्ण/शुध्द नकाराधिकार -**

- म्हणजे संसदेने संमत केलेल्या विधेयकाला संमती पूर्णपणे रोखून धरणे.

**गुणात्मक नकाराधिकार -**

- राष्ट्रअध्यक्षाच्या नकाराधिकारास गुणात्मक नकाराधिकार म्हणतात.

**निलंबनात्मक नकाराधिकार -**

- राष्ट्राध्यक्षांनी संसदेकडे पुनर्विचारार्थ पाठवलेल्या विधेयकास संसदेने पुन्हा साध्या बहुमताने पारित केले तरी राष्ट्रध्यक्षांना त्यास संमती दयावी लागेल, अशी तरतुद असल्यास राष्ट्रध्यक्षांच्या नकाराधिकारास निलंबनात्मक नकाराधिकार म्हणतात.

**पॉकेट नकाराधिकार -**

- म्हणजे संसदेने पारित केलेल्या विधेयकावर कोणताही निर्णय न घेता ते तसेच पडू देणे.
- भारतीय राष्ट्रपतींना 3 प्रकारचे नकाराधिकार प्राप्त.
  1) पूर्ण 2) निलंबनात्मक 3) पॉकेट नकाराधिकार

- 1986 मध्ये, राष्ट्रपती झैल सिंग यांनी राजीव गांधी सरकारने पारित केलेल्या Indian Postal Office Bill या विधेयकाबाबत पहिल्यांदा पॉकेट वापरला असे म्हणतात.
- तीन वर्षानंतर 1989 मध्ये राष्ट्रपती R. Venkatraman यांनी ते विधेयक संसदेकडे पुनर्विचारार्थ पाठविले मात्र ते रद्द झाले.

**घटनादुरुस्ती विधेयकाबाबत नकाराधिकार**

- राष्ट्रपतींना घटना दुरुस्ती विधेयकाबाबत नकाराधिकार प्राप्त नाही.
- 24 व्या घटना दुरुस्तीनुसार 1971 राष्ट्रपतींवर घटना दुरुस्ती विधेयकास मान्यता देण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

**राज्य विधेयकांबाबत राष्ट्रपतींचा नकाराधिकार प्राप्त आहे.**

- राष्ट्रपतींनी आपला निर्णय किती कालावधीत दयायचा या बाबत कोणतीही कालमर्यादा घटनेने निश्चित केलेली नसल्याने राष्ट्रपतींना राज्य विधेयकाबाबत पॉकेट व्हिटो सुध्दा उपलब्ध आहे.

**राष्ट्रपतींचा अध्यादेश/वटहुकूम जारी करण्याचा अधिकार**

- घटनेच्या कलम 123 नुसार, राष्ट्रपतींना संसदेच्या विराम काळात अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे.
- हा सर्वात मोठा अधिकार आहे.
- राष्ट्रपतींचा अध्यादेश काढण्याचा अधिकार संसदेच्या कायदेविषयक अधिकाराच्या समांतर नाही.
- 38 व्या घटनादुरुस्तीने (1975) राष्ट्रपतींची खात्री अंतिम व निर्णायक असल्याचे व न्यायिक पुर्नविलोकनाच्या अधिन नसल्याचे घोषित केले. मात्र हि तरतुद 44 व्या घटनादुरुस्त्या (1978) नुसार काढून टाकण्यात आली.
- अध्यादेशाचा महत्तम कालावधी 6 महिने 6 आठवडे इतका असतो.
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** मते - अध्यादेशाची व्यवस्था कार्यकारी मंडळास संसदेचे अधिवेशन चालू असतांना कोणत्याही अचानक व तात्कालिकपणे उद्‌भवलेल्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी होता.
- **डॉ. पी. वधवा खटल्यात** (1978) सर्वोच्च न्यायालयाने एकाच आशयाचा अध्यादेश पुन्हा पुन्हा काढणे घटनाविरोधी असल्याचे निकाल दिला आहे.
- अध्यादेश काढण्याचा अधिकार अपवादात्मक असून तो विधिमंडळाच्या कायदेविषयक अधिकाराची जागा घेऊ शकत नाही.
- **भारतरत्न मिळालेले राष्ट्रपती - (6)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. राजेंद्र प्रसाद | 2. | डॉ. राधाकृष्णन |
| 3. | डॉ. झाकिर हुसेन | 4. | व्ही. व्ही. गिरी |
| 5. | डॉ. ए. पी. जे कलाम | 6. | प्रणव मुखर्जी |

- **पदावर असताना मृत्यूपावलेले राष्ट्रपती - (2)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. झाकिर हुसेन | 2. | फ्रक्रुदीन अली अहमद |

- **सर्वाधिक मताने निवडून आलेले राष्ट्रपती -** डॉ. राजेंद्र प्रसाद
- **सर्वात कमी मताने निवडून आलेले राष्ट्रपती -** व्ही. व्ही. गिरी

- **सर्वात तरूण राष्ट्रपती -** निलम संजीव रेड्डी (64 वर्ष)
- **चार पंतप्रधानाबरोबर कार्य केलेले राष्ट्रपती -** आर. व्यंकटरमण (राजीव गांधी, व्ही.पी. सिंग, चंद्रशेखर, पी. व्ही. नरसिंह राव)
- **उपराष्ट्रपती पदावरून राष्ट्रपती झालेले -**
  1. डॉ. राधाकृष्णन
  2. डॉ. झाकिर हुसेन
  3. व्ही. व्ही. गिरी
  4. आर. व्यंकटरमण
  5. शंकरदयाळ शर्मा
  6. के. आर. नारायणन
- **दलित राष्ट्रपती -**
  1. के. आर. नारायणन
  2. रामनाथ कोविंद
- **भारताच्या एकमेव व पहिल्या महिला राष्ट्रपती -** प्रतिभा पाटील
- **अपक्षाचे उमेदवार असलेले एकमेव राष्ट्रपती -** व्ही. व्ही. गिरी
- **दोन वेळेस मतगणना होऊन निवडून आलेले राष्ट्रपती -** व्ही. व्ही. गिरी.
- **लोकसभा सभापती पदावरून राष्ट्रपती झालेले राष्ट्रपती -** निलम संजीव रेड्डी.
- **सर्वात कमी काळ राष्ट्रपती पदावर राहिलेले -** डॉ. झाकिर हुसेन
- **रामनाथ मैकुलाल कोविंद** हे देशाचे व्यक्ती म्हणून 14 वे तर पद म्हणून 15 वे राष्ट्रपती 25 जुलै, 2017 पासुन आहेत.

**स्वतंत्र भारताचे आतापर्यंतचे राष्ट्रपती – १९५२ ते २०२३**

| निवडणुक वर्षे | विजयी उमेदवार (राष्ट्रपती) | प्राप्त मते % | प्रमुख प्रतिस्पर्धी | प्राप्त मते % |
|---|---|---|---|---|
| 1952 | डॉ. राजेंद्र प्रसाद | 83.81 | के.टी.शाह | 15.3 |
| 1957 | डॉ. राजेंद्र प्रसाद | 99.35 | एन. एन. दास | 0.4 |
| 1962 | डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् | 98.24 | चौधरी हरी राम | 1.1 |
| 1967 | डॉ.झाँकीर हुसेन | 56.23 | के.सुब्बाराव | 43.4 |
| हंगामी | व्ही.व्ही.गिरी (3 मे ते 20 जूलै 1969) | | | |
| हंगामी | महम्मद हियादतुल्ला (20 जुलै ते 24 ऑगस्ट 1969) | | | |
| 1969 | व्ही.व्ही.गिरी | 50.22 | एन. संजीव रेड्डी | 48.5 |
| 1974 | फक्रुदिन अली अहमद | 80.18 | त्रिदेव चौधरी | 19.8 |
| हंगामी | बी. डी. जत्ती (11 फेब्रुवारी ते 24 जुलै 1977) | | | |
| 1977 | नीलम संजीव रेड्डी | बिनविरोधी | - | |
| 1982 | ग्यानी झैलसिंह | 72.73 | एच.आर.खन्ना | 27.6 |
| 1987 | आर.वेंकटरमण | 72.29 | व्ही.कृष्णाय्यर | 27.1 |
| 1992 | डॉ.शंकर दयाल शर्मा | 65.86 | जॉर्ज स्वेल | 33.21 |
| 1997 | के.आर.नारायणन् | 94.97 | टि. एन. सेशन | 5.07 |
| 2002 | डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम | 89.85 | लक्ष्मी सेहगल | 10.42 |
| 2007 | श्रीमती प्रतिभा पाटील | 65.82 | भैरवसिंह शेखावत | 34.17 |
| 2012 | प्रणव मुखर्जी | 69.0 | पी.ए.संगमा | 31.0 |
| 2017 | रामनाथ मैकुलाल गोविंद | 65.65 | मीराकुमार | 35.35 |
| 2022 | द्रौपदी शामचरण मुर्मू | 64.00 | यशवंत सिन्हा | 36.00 |



29/71